भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतंर्गत
असलेल्या प्रयोगशाळेत पाण्याचे नमूने
तपासण्याबाबत आकारावयाचे शुल्क

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-०११७/प्र.क्र.३६८/पापु-१५
सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,
क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग,मुंबई ४०० ००१
तारीख: २८ मार्च, २०१८

वाचा -

1) **शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांकः आपना-१०९८/प्र.क्र.३६१/पापु-१५, दिनांक २.११.१९९८**
2) **शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांकः डब्ल्युक्युएम-२०१४/प्र.क्र.०८/पापु-१२, दिनांक १८.१२.२०१४**
3) **शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांकः डब्ल्युक्युएम-२०१४/प्र.क्र.५९/पापु-१२, दिनांक २३.२.२०१५**
4) **शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांकः डब्ल्युक्युएम-२०१५/प्र.क्र.१२/पापु-१२, दिनांक ५.१०.२०१५**

प्रस्तावना -

महाराष्ट्र राज्याची भूशास्त्रीय व प्राकृतिक रचना तसेच पर्जन्यमानाची वैविध्यपूर्ण परिस्थिती लक्षात घेता, पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्याकरिता भूजल साठयाचे महत्व अनन्य साधारण आहे. यासाठी पाण्याची गुणवत्ता निर्देशित करणे अत्यंत आवश्यक आहे. भूजलाची गुणवत्ता तपासण्यासाठी भूजल सर्वेक्षण आणि विकास योजनेतंर्गत सन १९७७ साली पुणे येथे रासायनिक प्रयोगशाळेची स्थापना करण्यात आली. कामाच्या व्याप्तीत झालेली मोठया प्रमाणात वाढ विचारात घेता, सन १९८७ मध्ये पुणे, अमरावती, नागपूर, औरंगाबाद, नाशिक व कोकण येथे विभागीय प्रयोगशाळा स्थापन करण्यात आल्या.

२. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संनियंत्रणाखाली असलेल्या १३८ उपविभागीय प्रयोगशाळा, संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या आहेत. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या अधिपत्याखाली असलेल्या ६ विभागीय प्रयोगशाळेमध्ये पाणी

गुणवत्ता तपासणी करिता सन १९९८ च्या शासन निर्णयाप्रमाणे दर आकारले जात आहेत. सदरच्या विभागीय प्रयोगशाळांना राष्ट्रीय अधिस्वीकृतीकरण (NABL Accredited)प्राप्त झालेले आहे. त्या अनुषंगाने भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या अधिपत्याखाली असलेल्या ६ विभागीय, २८ जिल्हास्तरीय , १३८- उपविभागीय तसेच नव्याने मंजूर १० उपविभागीय तसेच नव्याने मंजूर १० उपविभागीय प्रयोगशाळा व राज्यस्तरीय प्रयोगशाळा अशा एकुण १८३ प्रयोगशाळेमध्ये पाणी गुणवत्ता तपासणीकरिता शुल्क वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय-

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या अधिपत्याखाली असलेल्या ६ विभागीय, २८ जिल्हास्तरीय, १४८ उपविभागीय व १ राज्यस्तरीय प्रयोगशाळेमध्ये पाणी गुणवत्ता तपासणीकरिता विविधशासकीय, निमशासकीय संस्था, शेतकरी, कारखानदार, सहकारी गृह निर्माण संस्था तसेच स्थानिक संस्थांकडून, खाजगी व्यक्तींकडून व्यापारी तत्वावर पाण्याचे रासायनिक व जैविक पृथ:करणासाठीचे शुल्क वाढविण्यासाठी शासन मान्यता देत आहे. भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या सर्व प्रयोगशाळेमार्फत करण्यात येणारी तपासणी व त्यासाठी आकारण्यात येणा-या शुल्काचे पत्रक सोबत परिशिष्ट - अ मध्ये दर्शविलेल्या विवरणपत्रामध्ये नमूद केले आहे. शुल्क आकारणीचे नविन दर दिनांक १ एप्रिल, २०१८ पासून पुढील तीन वर्षांसाठी लागु राहतील.

२. या पृथ:करणापासून उपलब्ध होणारा निधी मागणी क्र. वाय-८, ४४०२ मृद व जलसंधारण या वरील भांडवली खर्च ९०१, भांडवली लेखा व वजा वसूली (४४०२ ११९३) या लेखाशीर्षाखाली जमा करण्यात यावा.

३. या आदेशामधील नमूद केलेले सुधारीत दर दिनांक १ एप्रिल, २०१८ पासून लागु होतील.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या मान्यतेने व सहमतीने अनौपचारिक संदर्भ क्र. ६१/व्यय-३ दिनांक १६.२.२०१८ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२८१६३६१६०२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mahesh Bhagwan Sawant

Digitally signed by Mahesh Bhagwan Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d1f670a17d77c8ddff69694de2a07b7ff855dafef954aefa82ca28bd6cc6adb6, cn=Mahesh Bhagwan Sawant
Date: 2018.03.28 17:56:14 +05'30'

महेश सावंत
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय, मुंबई.
२. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय विभाग, मंत्रालय,मुंबई.
३. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक, राज्य आरोग्य विभाग, मुंबई.
५. संचालक, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,
६. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, मुंबई.
७. उप संचालक, राज्य आरोग्य शाळा, पुणे .
८. विभागीय उप संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (सर्व)
९. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, (सर्व)
१०.वित्त विभाग व्यय -३
११.निवड नस्ती पापु-१५

परिशिष्ट-अ

अ.क्र	परीक्षणाचे नाव	English Version	अस्तित्वातील दर	नविन प्रस्तावित दर
१	२	३	४	५
१	पी एच	pH	३५	१००
२	कंडक्टीव्हीटी	Conductivity	२५	१००
३	विरघळलेले क्षार	Total Dissolved Solids	४५	१००
४	गढूळपणा	Turbidity	३५	१००
५	कठीणपणा	Hardness	४५	१५०
६	कॅल्शियम	Calcium	३५	१५०
७	मॅग्नेशियम	Magnesium	३५	२००
८	सोडीयम	Sodium	४५	१५०
९	पोटॅशियम	Potassium	३५	१५०
१०	अल्कलिनिटी	Alkalinity	३५	१५०
११	लोह	Iron	७५	२००
१२	कार्बोनेट	Carbonate	१०	१००
१३	बायकार्बोनेट	Bicarbonate	१०	१००
१४	क्लोराईड	Chloride	४५	१००
१५	सल्फेट	Sulphate	५०	१५०
१६	फ्लोराईड	Fluoride	५०	२००
१७	नायट्रेट	Nitrate	५०	२००
Total			६६०	२४००
१८	कोलीफार्म	Coliform	२००	४००
१९	इ. कोलीफार्म	E.Coliform	२००	४००
Total			४००	८००

Mahesh Bhagwan Sawant

Digitally signed by Mahesh Bhagwan Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d1f670a17d77c8ddff69694de2a07b7ff855dafef954aefa82ca28bd6cc6adb6, cn=Mahesh Bhagwan Sawant
Date: 2018.03.28 17:57:17 +05'30'

महेश सावंत

उप सचिव, महाराष्ट्र शासन